बुधवार दि. २६ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करा

### शेतकऱ्यांच्या दहा मागण्यांसाठी शासनाकडे निवेदन






**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील शेतकरी सध्या पाणीटंचाई, अपुरे जलसिंचन, शेती उत्पादन खर्चात झालेली वाढ, प्रलंबित पीक विमा दावे, कर्जबाजारीपणा तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळत नसल्यामुळे आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकरी व ग्रामीण जनतेसाठी तातडीने दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना सुरू कराव्यात, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. या मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले असून, शेतकरी, जलसिंचन, पीक विमा, शिक्षण, ऊस उत्पादक आणि कर्जमाफीशी संबंधित एकूण दहा प्रमुख मागण्या शासनापुढे मांडण्यात आल्या आहेत. या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित सर्व विभागांना स्पष्ट आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

**पाणीटंचाई, अपुरे जलसिंचन, प्रलंबित पीक विमा, वाढता उत्पादन खर्च आणि ऊस उत्पादकांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याची मागणी**

जालना जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. अपुरा पाऊस, पाण्याची उपलब्धता आणि सिंचनाच्या मर्यादित सुविधा यामुळे शेतकऱ्यांसमोर सातत्याने संकट निर्माण होत आहे. त्यामुळे जिल्ह्याची वस्तुस्थिती लक्षात घेऊन जालना जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा (पान २ वर)

*अमरावती दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा प्रशासन सतर्क*

## जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे तातडीने फायर व इलेक्ट्रिकल ऑडिट करावे - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना – प्रतिनिधी**

अमरावती येथील रुग्णालयात घडलेल्या दुर्दैवी आगीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांच्या अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षेचा तातडीने आढावा घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील महिला व बाल रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच इतर सर्व शासकीय आरोग्य संस्थांचे फायर ऑडिट आणि इलेक्ट्रिकल ऑडिट तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



यासंदर्भात जिल्हाधिकारी मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज संबंधित विभागांची ऑनलाईन आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जालना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग तसेच संबंधित आरोग्य व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

रुग्णालयांच्या सुरक्षा ऑडिटदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींची केवळ नोंद करून न थांबता त्यावर तातडीने सुधारात्मक कार्यवाही करण्यात यावी. संबंधित यंत्रणांनी केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन सुनिश्चित करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

विशेषतः महिला व बाल रुग्णालयातील , , प्रसूती कक्ष, बालरुग्ण विभाग, , ऑपरेशन थिएटर आणि ऑक्सिजन सुविधा असलेल्या विभागांची प्राधान्याने तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची व्यवस्था सक्षम आहे की नाही, याची प्रत्यक्ष पाहणी करण्यावर भर देण्यात आला आहे.

फायर ऑडिटमध्ये फायर एक्स्टिंग्विशर, फायर अलार्म, स्मोक डिटेक्टर, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग तसेच रुग्णालयातील अग्निसुरक्षेच्या अन्य उपाययोजनांची कार्यक्षमता तपासण्यात येणार आहे. त्याचबरोबर (पान २ वर)

## जालना बसस्थानक परिसरात तीन लाखांचा गांजा जप्त; २४ वर्षीय तरुणाला अटक

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील नुरशहावली दर्गा रोड, बसस्थानक परिसरात स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत अवैध गांजा बाळगणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून तब्बल ६ किलो २८५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून, जप्त केलेल्या अंमली पदार्थाची किंमत पोलिसांनी ३ लाख ८ हजार ७५० रुपये असल्याचे सांगितले आहे. या कारवाईमुळे शहरात अवैध गांजा विक्री व वाहतुकीविरोधात पोलिसांनी पुन्हा एकदा कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. सुरज सदाशिव हाद्गुले (वय २४, रा. महेबुबनगर, अंबड, ता. अंबड, जि. जालना) असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध सदर बाजार पोलिस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ ( ) मधील कलम ८(क), २०(ब) (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जालना जिल्ह्यात अवैध गांजा विक्री आणि वाहतुकीवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव यांनी पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अवैध गांजा विक्री करणाऱ्या व्यक्तींची माहिती संकलित करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध गांजा विक्री करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेत असताना पोलिसांना सुरज हाद्गुले हा गांजा बाळगून असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिस पथकाने २५ ऑगस्ट २०२६ रोजी नुरशहावली दर्गा रोड परिसरात, बसस्थानकाजवळ कारवाई केली. यावेळी संशयित सुरज हाद्गुले याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेण्यात आली. (पान २ वर)

## प्रशिक्षणासाठी आलेल्या शालेय पोषण आहार कामगारांना प्रवास भत्ता व भोजन खर्चाची भरपाई द्या - ॲड. अनिल मिसाळ

**जालना – प्रतिनिधी**

शालेय पोषण आहार योजनेतील स्वयंपाकी व मदतनीसांना अन्न सुरक्षा मानके नियम, २०२० अंतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणासाठी झालेला प्रवास खर्च तसेच चहा–नाश्ता व जेवणाचा खर्च तातडीने देण्यात यावा, अशी मागणी सिटू संलग्न शालेय पोषण आहार कामगारा संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित, पौष्टिक व संतुलित आहार मिळावा, यासाठी ‘शाळेतील मुलांसाठी सुरक्षित अन्न आणि संतुलित आहार’ नियम, २०२० अंतर्गत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी शालेय पोषण आहाराचे प्रत्यक्ष स्वयंपाकाचे काम करणाऱ्या स्वयंपाकी व मदतनीसांनाही उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार अत्यल्प मानधनावर काम करणारे शेकडो कामगार प्रशिक्षणासाठी उपस्थित राहिले. मात्र, प्रशिक्षणाच्या ठिकाणी त्यांच्या चहा–नाश्ता व जेवणाची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. तसेच प्रशिक्षणासाठी ये–जा करण्यासाठी कोणताही प्रवास भत्ता देण्यात आलेला नसल्याने अनेक कामगारांना स्वतःच्या खिशातून २०० ते २५० रुपये किंवा त्यापेक्षा अधिक प्रवास खर्च करावा लागला. सध्या या कामगारांना केवळ ८३ रुपये प्रतिदिन इतके अत्यल्प मानधन मिळत असून, त्यांचे मागील दोन महिन्यांचे मानधनही थकीत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत प्रशिक्षणाचा प्रवास, भोजन व इतर खर्चही कामगारांनीच करणे अन्यायकारक असल्याचे कामगारांनी म्हटले आहे. शालेय पोषण आहार योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या स्वयंपाकी व मदतनीसांची विद्यार्थ्यांना सुरक्षित व पौष्टिक आहार देण्यात महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून प्रशिक्षणासाठी झालेला संपूर्ण खर्च शासनाने तातडीने भरून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात प्रशिक्षणासाठी उपस्थित राहिलेल्या सर्व कामगारांना नियमानुसार प्रवास भत्ता देणे, चहा–नाश्ता व जेवणाची व्यवस्था न झाल्याने झालेल्या खर्चाची भरपाई करणे, प्रत्यक्ष प्रवास खर्चाची परतफेड करणे, मागील दोन महिन्यांचे थकीत मानधन तातडीने अदा करणे तसेच भविष्यातील प्रशिक्षणावेळी प्रवास भत्ता व भोजनाची व्यवस्था करणे, या मागण्या करण्यात आल्या आहेत.

तसेच शालेय पोषण आहार कामगारांच्या मानधनात भरीव वाढ करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनावर मधुकर मोकळे, अनिल मिसाळ, योगेश फुसे आणि बाबासाहेब पाटोळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## गल्हाटी प्रकल्पात पाणी सोडण्यासाठी उपसा सिंचन योजना मंजूर करा : सतीश घाटगे

### शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा : राजकारण बाजूला ठेवून एकत्र येण्याचे आवाहन

**अंबड - प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील गल्हाटी प्रकल्पात जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून पाणी सोडण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य राजू काकडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजपा नेते सतीश घाटगे यांनी भेट देऊन जाहीर पाठिंबा दिला. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून सुरू असलेल्या या न्याय्य मागणीसाठी आपण पूर्ण



ताकतीने शेतकऱ्यांच्या सोबत असल्याचा विश्वास त्यांनी शेतकऱ्यांना दिला. तसेच गल्हाटी प्रकल्पात डाव्या कालव्याचे पाणी सोडण्यासाठी उपसा सिंचन योजना मंजूर करण्याची मागणी केली.

यावेळी बोलताना सतीश घाटगे म्हणाले की, ‘‘दाढेगावसह परिसरातील दुष्काळ कायमचा हटविण्यासाठी डाव्या कालव्याचे पाणी गल्हाटी प्रकल्पात आलेच पाहिजे, ही भूमिका सुरुवातीपासून राहिली आहे. यासाठी जलसंधारण विभागाकडे पाठपुरावा करून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देखील प्राप्त झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रात उपसा सिंचन योजना राबवून अनेक कोरड्या प्रकल्पांना संजीवनी देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर जायकवाडीच्या डाव्या कालव्यावर उपसा सिंचन योजना मंजूर करून गल्हाटी प्रकल्पात पाणी आणणे तांत्रिकदृष्ट्या पूर्णपणे शक्य आहे. असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी सर्वपक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्व लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांनी (पान २ वर)

## जे.ई.एस.महाविद्यालय व अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे ‘खेलो इंडिया संवाद युवा कनेक्ट’ कार्यक्रमाचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

आगामी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर मेरा युवा भारत जालना यांच्या सहकार्याने जे.ई.एस.महाविद्यालय व अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथील राष्ट्रीय सेवा योजना () यांच्या वतीने ‘खेलो इंडिया संवाद युवा कनेक्ट’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन २७ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. यानिमित्ताने युवकांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे, क्रीडा विकासाला चालना देणे आणि राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका बळकट करणे या उद्देशाने देशभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

‘युवा कनेक्ट’ उपक्रमाच्या माध्यमातून युवक, खेळाडू, युवा नेते, स्वयंसेवक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांना एका व्यासपीठावर आणून भारतातील क्रीडा क्षेत्राचा विकास, युवकांच्या आकांक्षा आणि भविष्यातील संधी याबाबत संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांचा आभासी संवाद. २७ ऑगस्ट रोजी देशभरातील विविध ठिकाणांहून लाखो युवक या कार्यक्रमाशी जोडले जाणार असून, जालना जिल्ह्यातील युवकांनाही या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने युवक, स्वयंसेवक, स्वयंसेवक आणि स्थानिक खेळाडू यांच्यात विशेष संवाद आयोजित करण्यात येणार आहे. या संवादामध्ये क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास, क्रीडा क्षेत्रातील उपलब्ध संधी, ग्रामीण व तळागाळातील खेळाडूंना प्रोत्साहन तसेच भारतातील विकसित होत असलेली क्रीडा परिसंस्था याबाबत चर्चा केली जाणार आहे. यावेळी ‘युवा संवाद’ आयोजित करून युवकांना भारतीय क्रीडा क्षेत्राच्या भविष्यासंदर्भात आपल्या कल्पना, सूचना आणि आकांक्षा मांडण्याची संधी देण्यात येणार आहे. यामध्ये पुढील प्रमुख विषयांवर विचारमंथन करण्यात येईल :

१. क्रीडा परिसंस्थेचे बळकटीकरण दर्जेदार क्रीडा सुविधा, प्रशिक्षक, प्रशिक्षण व्यवस्था आणि तळागाळातील क्रीडा संधी उपलब्ध करून देणे.

२. २०३६ ऑलिम्पिकसाठी क्रीडा प्रतिभेचे संवर्धन वैज्ञानिक (पान २ वर)

# पान १ व ४ वरुन...

## जालना जिल्हा...

आणि त्यानुसार शेतकरी तसेच ग्रामीण भागासाठी तातडीच्या दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. दुष्काळ जाहीर केल्यानंतर पाणी, चारा, रोजगार, शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आवश्यक असलेल्या उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची मागणीही करण्यात आली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावाचा स्वतंत्र जलसिंचन आराखडा तयार करण्यात यावा. गावनिहाय पाण्याचे उपलब्ध स्रोत, जलसाठे, सिंचनाची सद्यस्थिती, आवश्यक जलसंधारणाची कामे, कालवे व वितरिकांची क्षमता यांचा अभ्यास करून हा आराखडा तयार करावा आणि त्याची कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. जलसिंचनाच्या प्रश्नाकडे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांच्या माध्यमातून न पाहता प्रत्येक गावाला दीर्घकालीन सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विविध प्रस्तावित तसेच प्रलंबित जलसिंचन प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. अनेक प्रकल्प विविध कारणांमुळे रखडल्याने त्याचा थेट परिणाम शेतीच्या सिंचन क्षमतेवर होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच विद्यमान जलसिंचन प्रकल्पांची क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक त्या दुरुस्ती व देखभालीची कामे तातडीने हाती घेण्याची मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील जलसिंचन व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असलेल्या जायकवाडी डावा कालवा तसेच त्याच्या वितरिकांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. कालवे व वितरिकांमधील गळती, अडथळे किंवा अन्य तांत्रिक त्रुटींमुळे सिंचनासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्यावर परिणाम होत असल्याने त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विशेष दुरुस्ती मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे उपलब्ध पाण्याचा अधिकाधिक वापर शेतीसाठी करता येईल आणि शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. जी रामजी योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी ७० टक्के निधी जलसिंचनाच्या कामांवर खर्च करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. जलसंधारण, सिंचन क्षमता वाढविणे आणि शेतीला पाणी उपलब्ध करून देणे यासाठी निधीचा प्राधान्याने वापर करण्याची मागणी आहे. सन २०२५-२६ ऊस गाळप हंगामातून निर्माण झालेल्या साखरेच्या वाढलेल्या दराचा लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति टन ११,००० वाढीव दर तातडीने देण्यात यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

ऊस उत्पादनासाठी लागणारा वाढता खर्च, मजुरी, खते, औषधे, पाणी आणि वाहतूक खर्च यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर आर्थिक भार वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे साखरेच्या दरातील वाढीचा योग्य हिस्सा उत्पादक शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक असल्याची भूमिका मांडण्यात आली आहे. सन २०२४ खरीप पीक विमा योजनेअंतर्गत प्रलंबित असलेले सर्व दावे तातडीने निकाली काढावेत आणि पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची रक्कम वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पीक नुकसान झाल्यानंतर विमा संरक्षणाच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळणे अपेक्षित असताना अनेक पात्र शेतकऱ्यांचे दावे प्रलंबित राहिल्यास त्यांच्यावर आर्थिक संकट अधिक तीव्र होते. त्यामुळे विमा दाव्यांची विशेष मोहीम राबवून प्रकरणे जलदगतीने निकाली काढावीत, अशी मागणी आहे.

शेतकरी आणि ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक अभ्यासक्रमांचे शुल्क माफ करण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. कोर्स, डिप्लोमा, पदवी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्काचा आर्थिक भार सहन करावा लागू नये, यासाठी शासनाने विशेष निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये, यासाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात म्हटले आहे. सन २०१२ ते २०२५ या कालावधीत कर्ज घेतले असतानाही कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर एक लाख रुपये देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. कर्जमाफीच्या योजनांमध्ये काही पात्र शेतकरी विविध कारणांमुळे वंचित राहिले असल्यास त्यांची स्वतंत्रपणे तपासणी करून त्यांना न्याय देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मराठवाडा पॅकेज व डीपीसी निधी शिक्षण-सिंचनासाठी वापरण्याची मागणी

मराठवाडा पॅकेजअंतर्गत मिळालेला निधी तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीपैकी ५० टक्के निधी शिक्षण व्यवस्था आणि जलसिंचन व्यवस्था सुधारण्यासाठी खर्च करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील शिक्षणाच्या पायाभूत सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा तसेच जलसिंचनाची क्षमता वाढविण्यासाठी उपलब्ध निधीचा प्राधान्याने वापर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अंमलबजावणीसाठी स्वतंत्र समिती गठित करण्याची मागणी

निवेदनातील मागण्यांवर केवळ प्रशासकीय पातळीवर चर्चा न करता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने संबंधित सर्व विभागांना आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या मागण्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र समिती गठित करावी. समितीने वेळोवेळी कामांचा आढावा घेऊन शासनाला अहवाल सादवावा आणि मंजूर उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे की नाही, याची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी आणि नागरिकांच्या हिताच्या या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागण्यांवर ठोस निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी न झाल्यास शेतकरी बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शासनाला देण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील पाणी, शेती, सिंचन, पीक विमा, ऊस उत्पादक, कर्जबाजारी शेतकरी आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न एकमेकांशी संबंधित असल्याने शासनाने त्याकडे स्वतंत्र-स्वतंत्र मागण्या म्हणून न पाहता व्यापक जिल्हा विकासाच्या दृष्टीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. शासन या दहा मागण्यांवर कोणती भूमिका घेते आणि जालना जिल्ह्यासाठी कोणत्या तातडीच्या उपाययोजना जाहीर करते, याकडे आता जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## जिल्ह्यातील सर्व..

विद्युत वायरिंग, विद्युत पॅनेल, अर्थिंग, जनरेटर आणि इतर विद्युत उपकरणांची कार्यस्थितीही प्रत्यक्ष तपासण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.

रुग्णालयांमध्ये आग किंवा अन्य आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास कोणत्या पद्धतीने रुग्णांचे स्थलांतर करायचे, यासाठी प्रत्येक आरोग्य संस्थेने स्पष्ट तयार ठेवावा. या योजनेत नवजात बालके, गर्भवती व प्रसूती झालेल्या महिला, दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, मधील रुग्ण तसेच हालचाल करण्यास असमर्थ रुग्णांच्या सुरक्षित आणि जलद स्थलांतरासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करावी, असेही सांगण्यात आले.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अग्निसुरक्षा प्रशिक्षणासोबत प्रत्यक्ष मॉकड्रिल घेण्याचे निर्देश ही यावेळी देण्यात आले आहेत. डॉक्टर, परिचारिका, तांत्रिक कर्मचारी, सुरक्षारक्षक आणि अन्य रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना आग लागल्यानंतर करावयाच्या प्रथम प्रतिसादाची माहिती देण्यात यावी.

अग्निशमन उपकरणांचा योग्य वापर, फायर अलार्म यंत्रणा, आपत्कालीन संपर्क व्यवस्था आणि रुग्णांचे सुरक्षित स्थलांतर याबाबत कर्मचाऱ्यांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात यावे. आपत्कालीन परिस्थितीत कोणत्याही प्रकारची गोंधळाची स्थिती निर्माण होऊ नये, यासाठी नियमित सराव करण्यावरही भर देण्यात आला. ‘‘रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची सुरक्षा ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. विशेषतः महिला, नवजात बालके, लहान मुले, दिव्यांग व्यक्ती आणि अतिदक्षता विभागातील रुग्ण आपत्कालीन परिस्थितीत अधिक असुरक्षित असतात. त्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षेबाबत कोणत्याही स्तरावरील निष्काळजीपणा स्वीकारला जाणार नाही. संभाव्य धोका आधीच ओळखून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात,’’ असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले. फायर ऑडिट, इलेक्ट्रिकल ऑडिट, ऑडिटमध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता, मॉकड्रिल आणि कर्मचारी प्रशिक्षण या सर्व बाबींवर आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचा विद्युत विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी परस्पर समन्वयाने तातडीने कार्यवाही करावी. या सर्व कार्यवाहीचा अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिले.

## जालना बसस्थानक ...

झडतीदरम्यान आरोपीच्या ताब्यातून ६ किलो २८५ ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला. पोलिसांनी जप्त केलेल्या या अंमली पदार्थाची किंमत ३ लाख ८ हजार ७५० रुपये असल्याचे नमूद केले आहे. गांजा जप्त करून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. जप्त मुद्देमालाचा पंचनामा करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांच्या सरकारतर्फे फिर्यादीवरून सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीविरुद्ध कायद्यातील कलम ८(क) आणि २०(ब) (ब) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. गांजा कुठून आणण्यात आला होता, तो कोणाला विक्री करण्यात येणार होता, तसेच या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, या दृष्टीने तपास केला जाण्याची शक्यता आहे. जालना शहर आणि जिल्ह्यात गांजा, गुटखा तसेच अन्य अवैध पदार्थांच्या विक्रीविरोधात पोलिसांकडून वेळोवेळी कारवाया करण्यात येत आहेत. बसस्थानक, बाजारपेठ, दर्गा परिसर तसेच शहरातील वर्दळीच्या ठिकाणी अशा प्रकारच्या अवैध व्यवहारांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून माहिती संकलन आणि गस्त वाढविण्यात येत आहे.

६ किलोपेक्षा अधिक गांजा एका व्यक्तीकडून जप्त झाल्याने या प्रकरणाकडे पोलिस यंत्रणेचे विशेष लक्ष राहणार आहे. आरोपी हा केवळ गांजा बाळगून होता की, त्यामागे विक्री किंवा पुरवठ्याचे मोठे नेटवर्क कार्यरत आहे, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलिस अधीक्षक विक्रम साळी आणि जालना उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव, सहायक पोलिस उपनिरीक्षक सचिन खामगळ, पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलिस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, विजय डिक्कर, फुलचंद गव्हाणे, इरशाद पटेल, सतीश श्रीवास, रमेश काळे, योगेश सहाने, प्रदीप करतारे, गणपत पवार आणि सुनील पवार यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### गांजा कुठून आला? पुरवठादार कोण?

**या कारवाईत गांजा जप्त करून आरोपीला ताब्यात घेण्यात आले असले तरी, या प्रकरणाचा पुढील तपास महत्त्वाचा ठरणार आहे. आरोपीकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात गांजा कसा आला, त्याचा पुरवठा कोणी केला, हा गांजा जालना शहरात विक्रीसाठी आणण्यात आला होता का, तसेच या व्यवहारात आणखी व्यक्तींचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून केला जाणार आहे.**

## गल्हाटी प्रकल्पात...

एकत्र येऊन हा लढा तीव्र व यशस्वी करावा, असे आवाहनही त्यांनी केले. या आंदोलनात शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे, शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे आर.व्ही. छल्लारे यांच्यासह परिसरातील स्थानिक पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## जे.ई.एस.महाविद्यालय...

पद्धतीने क्रीडा प्रतिभा शोधणे, खेळाडूंची निवड व विकास
आणि उच्च दर्जाचे प्रशिक्षण.

३. युवा नेतृत्व व प्रशासनातील सहभाग युवकांना निर्णयप्रक्रिया, सामाजिक उपक्रम आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सहभागी करून घेणे.

४. विकसित भारतासाठी युवा सक्षमीकरण कौशल्यविकास, स्वयंसेवा, नेतृत्वगुण आणि राष्ट्रनिर्माणाच्या विविध संधींमध्ये युवकांचा सहभाग वाढविणे.

५. युवकांच्या सूचना व कल्पना च्या माध्यमातून संकलित करण्यात येणार असून, उपस्थित युवकांना
मध्ये सहभागी होण्यासाठीही प्रोत्साहित करण्यात येणार आहे.

मेरा युवा भारत ( ), जालना, जे.ई.एस.महाविद्यालय व अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना यांच्या वतीने जिल्ह्यातील युवकांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन भारतीय क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आपल्या कल्पना व सूचना मांडाव्यात आणि ‘विकसित भारत’ घडविण्याच्या राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नांदेड मनपातर्फे...

टीम गठीत केली तर निश्चितच,सर्वेक्षण कार्य करण्यात नांदेड महानगरपालिका राज्यात अग्रेसर दिसेल व नगर परिषद संचालनाय यांनी काढलेल्या पत्राची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी,अशी मागणी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य गजानन जोशी यांनी निवेदनाद्वारे केली आहे...

## अल्पवयीन मुलीवरील...

आले. त्यानंतर आरोपीने पीडितेशी सुमारे सात ते आठ महिन्यांपासून शारीरिक संबंध ठेवले. त्यामुळे पीडिता गर्भवती राहिली.

पीडिता आईसोबत नातेवाईकांकडे राहण्यासाठी गेल्यानंतरही आरोपीने तिचा पाठलाग केला. आरोपीने आपल्या बहिणी व मेव्हण्याला सोबत घेऊन पीडिता राहत असलेल्या ठिकाणी जाऊन तिला रिक्षातून आरोपीच्या मित्राकडे नेल्याचे प्रकरणाच्या तपासात समोर आले.

### आठ ते दहा दिवस दुसऱ्या ठिकाणी ठेवले

आरोपींनी पीडितेला आरोपीच्या मित्राच्या ठिकाणी सुमारे आठ ते दहा दिवस ठेवले. यावेळी आरोपी शिवाजी कालबिले आणि बाली उर्फ किरण कालबिले यांनी आरोपी व पीडितेला जेवण आणून दिल्याचे तसेच त्यांना मदत केल्याचे प्रकरणात नमूद करण्यात आले आहे.

यानंतर भाड्याच्या खोलीत आरोपी नितीनने पीडितेसोबत शारीरिक संबंध ठेवले. यावेळी आरोपीने पीडितेला लग्नाचे आमिष दाखविल्याचेही तपासात निष्पन्न झाले.

### आईने पोलिसांत दिली होती हरवल्याची तक्रार

दरम्यान, पीडित मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिच्या आईने १२ जुलै २०१९ रोजी जवाहरनगर पोलिस ठाण्यात ती हरवल्याबाबत तक्रार दाखल केली होती.

यानंतर आरोपी नितीन आपल्या वडिलांच्या सांगण्यावरून पीडितेला घेऊन करमाड पोलिस ठाण्यात हजर झाला. त्यानंतर पीडितेला महिला सुधारगृहात पाठविण्यात आले. मात्र, पीडित मुलीने आईसोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे तिला सुधारगृहातून सोडवून कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले.

घरी आल्यानंतर आई-वडिलांनी विचारपूस केली असता पीडित मुलीने आपल्यासोबत घडलेली संपूर्ण हकीगत सांगितली.

### महिला दक्षता समितीच्या सदस्यासमोर फिर्याद

पीडितेने २७ सप्टेंबर २०१९ रोजी जवाहरनगर पोलिस ठाण्यात महिला दक्षता समितीच्या सदस्यासमोर आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. त्यानंतर हे प्रकरण पारध पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आले.

पारध पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३५/२०१९ नुसार भारतीय दंड विधानातील कलम ३६३, ३७६, ५०६ सह ३४ तसेच पोक्सो कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

### तपासानंतर न्यायालयात दोषारोपपत्र

या प्रकरणाचा तपास रविंद्र साळोखे, सहायक पोलिस आयुक्त, उस्मानपुरा विभाग, औरंगाबाद शहर आणि सुनील जायभाये, उपविभागीय पोलिस अधिकारी, भोकरदन यांनी केला. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

न्यायालयीन सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण आठ साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. यामध्ये पीडित मुलगी, तिचे वडील, घटनास्थळ पंच किशोर सोळंके, पीडितेचे वय सिद्ध करणारे शाळेचे मुख्याध्यापक अलीबाबा रशीद तडवी तसेच पोलिस साक्षीदार संदीप तागड, श्रद्धा वायदंडे आणि तपास अधिकारी रविंद्र साळोखे व सुनील जायभाये यांच्या साक्षी महत्त्वाच्या ठरल्या.

### शाळेच्या दाखल्यातून वय सिद्ध

या प्रकरणात पीडित मुलगी घटनेच्या वेळी अल्पवयीन असल्याचे सिद्ध करणे महत्त्वाचे होते. त्यासाठी शाळेकडून प्राप्त झालेला निर्गम उतारा हा महत्त्वाचा पुरावा ठरला. या कागदपत्राच्या आधारे पीडितेचे वय १६ वर्षे असल्याचे सरकार पक्षाने न्यायालयासमोर सिद्ध केले.

तसेच आरोपी आणि पीडितेच्या वैद्यकीय अहवालांसह पीडितेला झालेल्या बाळाचा डीएनए अहवालही न्यायालयीन प्रक्रियेत महत्त्वाचा ठरला. उपलब्ध पुरावे आणि साक्षींच्या आधारे न्यायालयाने आरोपीविरुद्धचे आरोप सिद्ध झाल्याचे मान्य केले.

### मुख्य आरोपीला १० वर्षांची शिक्षा

सरकार पक्षाने सादर केलेले पुरावे आणि केलेला युक्तिवाद विचारात घेत न्यायालयाने आरोपी नितीन दत्तू पोटदुखे याला भारतीय दंड विधानातील कलम ३७६(२)(एन) तसेच पोक्सो कायद्यातील कलम ४ आणि ८ अन्वये दोषी ठरविले.

त्याला १० वर्षांची सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. दंड न भरल्यास त्याला आणखी सहा महिन्यांचा सक्त कारावास भोगावा लागणार आहे.

याशिवाय पीडितेला आरोपीसोबत नेण्यास व त्याला मदत करण्यासंदर्भात आरोपी नितीन पोटदुखे, शिवाजी कालबिले आणि बाली उर्फ किरण कालबिले यांना भारतीय दंड विधानातील कलम ३६३ सह ३४ अन्वये दोषी ठरविण्यात आले. तिघांनाही सहा महिन्यांची सक्तमजुरी व प्रत्येकी पाच हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. दंड न भरल्यास प्रत्येकी एक महिन्याचा सक्त कारावास भोगावा लागणार आहे.

### दंडाची २० हजारांची रक्कम पीडितेला देण्याचे आदेश

या निकालातील महत्त्वाचा भाग म्हणजे न्यायालयाने आरोपींकडून वसूल करण्यात येणारी एकूण २० हजार रुपयांची दंडाची रक्कम पीडित मुलीला देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे न्यायालयीन निकालासोबत पीडितेला आर्थिक मदतीचा दिलासा मिळणार आहे.

### सरकार पक्षाचा प्रभावी युक्तिवाद

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे विशेष जिल्हा सरकारी अभियोक्ता वर्षा लक्ष्मीकांत मुकीम यांनी काम पाहिले. त्यांनी न्यायालयासमोर सादर झालेल्या साक्षी, दस्तऐवजी पुरावे, वैद्यकीय अहवाल आणि डीएनए अहवालाच्या आधारे सरकार पक्षाची बाजू मांडली.

पोलिस तपासातील पुरावे आणि साक्षींच्या आधारे आरोपींवरील आरोप सिद्ध करण्यात सरकार पक्षाला यश आले.

### पोलिस यंत्रणेचेही योगदान

या प्रकरणात जालना पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक आणि उपविभागीय पोलिस अधिकारी, भोकरदन यांच्या मार्गदर्शनाखाली तपास व न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक पाठपुरावा करण्यात आला. पारध पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि माने, सेशन कोर्ट पैरवी पोलिस अंमलदार तसेच जिल्हा सरकारी वकील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही प्रकरणाच्या न्यायालयीन प्रक्रियेत महत्त्वाची मदत केली. अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणात न्यायालयाने मुख्य आरोपीला दहा वर्षांची सक्तमजुरी सुनावल्याने या निकालाकडे महत्त्वपूर्ण न्यायालयीन निर्णय म्हणून पाहिले जात आहे.

## नांदेड मनपातर्फे...

कृषी प्रक्रिया उद्योगा विषयी बोलताना श्री. वैजनाथ धांडे यांनी ऑईल मिल, डाळ मिल यांसारखे प्रक्रिया युनिट कसे सुरू करावे, यावर प्रकाश टाकला. तर श्री. धनंजय मस्के यांनी सविस्तर प्रकल्प अहवालासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, विविध परवानग्या आणि ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत याविषयी शेतकऱ्यांना प्रशिक्षित केले.

या प्रसंगी श्री गायके,बँक ऑफ महाराष्ट्रच्या व्यवस्थापकांनी उपस्थित राहून प्रकल्पासाठी मिळणारे बँक कर्ज, त्याची प्रक्रिया आणि कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेची सविस्तर माहिती दिली व व्याजात ३ टक्के सवलत घेण्याचे आवाहन केले. तसेच वखार महामंडळाच्या रेळेकर यांनी गोडाऊनचे अंदाजपत्रक तयार करणे, त्याची उभारणी आणि तांत्रिक तपासणी कशी करावी, याचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप व अध्यक्षीय मार्गदर्शन करताना विभागीय कृषी सहसंचालक श्री. सुनील वानखेडे यांनी, शेतकऱ्यांनी केवळ उत्पादक न राहता प्रक्रिया उद्योगांकडे वळून आपले आर्थिक उत्पन्न वाढवावे, असे आवाहन केले. शासनाच्या या योजनांचा लाभ घेऊन जास्तीत जास्त कृषी उद्योजक तयार व्हावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला विशेषज्ञ राकेश झगडे, सौ.जनाताई नयने, सौ.शेळके व आत्माचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री दत्तात्रय सूर्यवंशी यांच्यासह प्रकल्प समन्वयक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सहायक कृषी अधिकारी श्री योगेश तहकीक यांनी केले.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण...

या कालावधीत १५६ शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले. इयत्ता सहावीच्या वर्गशिक्षकांसाठी ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर या कालावधीत प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यामध्ये ७० शिक्षक सहभागी होणार आहेत.

गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता प्रा. विलास कडाळे आणि शिक्षण विस्तार अधिकारी के. जी. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण सुरू आहे. साधनव्यक्ती संतोष गिऱ्हे, अभिमान बायस, विद्या पतंगे, ज्योती चव्हाण, भिमेश्वर इज्जपवार, आत्माराम कोकाटे, संदीप वाघमारे, देविदास मामीलवार आणि विठ्ठल वडुळे हे सुलभक म्हणून प्रशिक्षणाचे कार्य करीत आहेत.

नवीन अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, हा या प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे. या प्रशिक्षणास गंगाधर वानोळे,गजानन चिकाळकर, एस.जी. ढाकरे यांच्यासह तालुक्यातील शिक्षक उपस्थित होते.

# भाजप बजाजनगर महिला मोर्चाच्या तालुका महिला कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न

**वाळूज महानगर - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी बजाज नगर महिला मोर्चाच्या तालुका महिला कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक उत्साह, जोश आणि सकारात्मक वातावरणात नुकतीच संपन्न झाली. भारतीय जनता पार्टी जिल्हा प्रभारी सौ. अमृताताई पालोदकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बजाज नगर महिला मोर्चाच्या महिला अध्यक्ष सौ लताताई माळी यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीमध्ये महिला मोर्चाच्या आगामी कार्याचा व्यापक आढावा घेण्यात आला. तसेच संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासोबतच आगामी काळातील विविध सामाजिक, जनजागृती आणि पक्षीय उपक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीमध्ये महिला मोर्चाची संघटनात्मक ताकद वाढविणे, बूथ पातळीपासून महिला कार्यकर्त्यांचे संघटन मजबूत करणे, नव्या महिला कार्यकर्त्यांना पक्षाच्या विचारधारेशी जोडणे आणि महिलांचा पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढविणे यावर विशेष भर देण्यात आला. याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या विविध महिलांसाठीच्या कल्याणकारी योजना, महिला सक्षमीकरणाचे उपक्रम आणि विकासकामांची माहिती सर्वसामान्य महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती अभियान राबविण्याबाबतही सकारात्मक विचारविनिमय करण्यात आला. महिला मोर्चाच्या माध्यमातून आगामी काळात सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम, महिला जनजागृती कार्यक्रम, स्वच्छता व पर्यावरण संवर्धन, आरोग्यविषयक उपक्रम तसेच शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.अध्यक्षीय मार्गदर्शन करताना सौ. अमृता ताई पालोदकर यांनी महिला कार्यकर्त्यांनी एकजुटीने, नियोजनबद्ध पद्धतीने आणि सक्रिय सहभागाने काम करण्याचे आवाहन केले. प्रत्येक महिला कार्यकर्तीने आपल्या परिसरात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासोबतच समाजहिताचे कार्य प्रभावीपणे करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

यावेळी उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांनीही आपल्या सूचना व मनोगत व्यक्त केले. आगामी काळातील कार्य अधिक गतिमान करण्यासाठी सर्वांनी एकदिलाने आणि एकजुटीने काम करण्याचा संकल्प केला.या बैठकीमुळे बजाज नगर महिला मोर्चाच्या आगामी कार्याला नवी दिशा आणि नवी ऊर्जा मिळाली असून, महिला शक्तीच्या माध्यमातून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार या बैठकीतून अधोरेखित झाला. बैठकीला उपस्थित महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

आगामी काळात बजाज नगर महिला मोर्चाच्या माध्यमातून विविध लोकाभिमुख व समाजोपयोगी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविले जाणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या बैठकीसाठी अमृता पालकर.मोहिनी बडे, तालुका अध्यक्ष लताताई माळी, शोभाताई सरकटे. कमलताई गरड. यांची उपस्थिती होती.

# महेश इंडस्ट्रियल ग्रुपच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा दिमाखदार शुभारंभ

## संस्थापक स्व. भागीरथजी तपाडिया यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ

**पुणे - प्रतिनिधी**

महेश इंडस्ट्रियल ग्रुपच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा शुभारंभ तसेच संस्थापक स्व. श्री. भागीरथजी तपाडिया यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ 'संगम वारशाचा गौरव, भविष्याची प्रेरणा' या विशेष सोहळ्याने उत्साहात झाला. पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे महेश्वरी समाजातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. गेल्या ५० वर्षांत महेश इंडस्ट्रियल ग्रुपने उद्योजकांना एकत्र आणत संवाद, ज्ञानविनिमय, परस्पर सहकार्य आणि उद्योजकीय विकासासाठी प्रभावी व्यासपीठ निर्माण केले आहे. संस्थापक स्व. श्री. भागीरथजी तपाडिया यांनी रुजवलेल्या उद्योजकीय मूल्यांचा आणि दूरदृष्टीचा वारसा पुढे नेत, सुवर्णमहोत्सवी वर्षात संस्थेला नव्या दिशेने आणि व्यापक व्याप्तीकडे घेऊन जाण्याचा संकल्प या सोहळ्यातून व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे विश्वस्त श्री. रतन राठी यांच्या स्वागतपर मनोगताने झाली. त्यानंतर विश्वस्त श्री. बजरंग लोहिया यांनी संस्थेच्या स्थापनेमागील उद्दिष्टे, पायाभरणी आणि गेल्या पाच दशकांत संस्थेला दिशा देणाऱ्या नेतृत्वाचा आढावा घेतला. संस्थेच्या प्रवासातील सातत्य, मूल्याधिष्ठित कार्यपद्धती आणि उद्योजकांना एकत्र आणण्याच्या भूमिकेवर त्यांनी प्रकाश टाकला. या प्रसंगी डॉ. परिमल मर्चंट, डॉ. संजय मालपाणी आणि श्री. विनोद बहेती यांनी उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. डॉ. परिमल मर्चंट यांनी कुटुंब व्यवसायातील महिलांची भूमिका,



मूल्याधिष्ठित नेतृत्व आणि व्यवसायातील सकारात्मक विचारसरणी यावर मार्गदर्शन केले. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या अध्यक्षा श्रीमती नेहा लड्डड यांच्या नेतृत्वाखाली महेश इंडस्ट्रियल ग्रुपच्या राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. संस्थेच्या विविध उपक्रमांची, सदस्यांची आणि गेल्या पाच दशकांत उभारलेल्या सामूहिक सामर्थ्याची सांगड घालत, संस्थेच्या विचारांचा आणि उद्योजकीय संस्कृतीचा देशभर विस्तार करण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. देशभरातील उद्योजकांना जोडणे, ज्ञान व अनुभवांची देवाणघेवाण वाढवणे आणि नव्या पिढीला उद्योजकतेसाठी प्रेरित करणे हा या राष्ट्रीय उपक्रमाचा व्यापक उद्देश आहे. कार्यक्रमादरम्यान विश्वस्त श्री. राजेंद्र तपाडिया यांनी संस्थेचे संस्थापक आणि त्यांचे वडील स्व. श्री. भागीरथजी तपाडिया यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. संस्थेच्या निर्मितीमागील त्यांचे योगदान, उद्योजकीय दृष्टी आणि समाजासाठी केलेले कार्य यांचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची बांधिलकी त्यांनी व्यक्त केली.

संस्थापकांच्या जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ हा संपूर्ण सोहळ्याचा भावनिक आणि प्रेरणादायी केंद्रबिंदू ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव श्री. कुश राठी आणि श्रीमती आकांक्षा राठी यांनी प्रभावीपणे केले. श्री. आदित्य तपाडिया यांनी आभार मानले. गोपाल झंवर आणि शाम भूतडा यांनी स्वागत केले. या कार्यक्रमाला हीरालाल मालू, राजकुमार अग्रवाल, नितीन न्याती, विठ्ठल मनियार, अभय करवा, रवि राठी, गिरधर काळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. वारशाचा गौरव, वर्तमानातील कर्तृत्वाचा उत्सव आणि भविष्याची प्रेरणा यांचा सुंदर संगम घडवणाऱ्या या सोहळ्याच्या माध्यमातून महेश इंडस्ट्रियल ग्रुपच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची उत्साहपूर्ण सुरुवात झाली. संस्थापकांच्या विचारांना नवी दिशा देत, सामूहिक शक्तीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर उद्योजकतेचे नवे पर्व निर्माण करण्याचा निर्धार या सोहळ्यातून व्यक्त करण्यात आला.

# लावणी गावात रात्रीची वीज गायब; संतप्त ग्रामस्थांचा महावितरण कार्यालयासमोर ठिय्या

**मंठा । प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील लावणी गावात रात्रीच्या वेळी वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने संतप्त ग्रामस्थांनी मंगळवारी (दि. २५) वाटूर येथील महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. नियमित आणि सुरळीत वीजपुरवठा मिळत नसल्याने गावातील नागरिक, शेतकरी तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

गेल्या काही दिवसांपासून लावणी परिसरातील वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला असून, विशेषतः रात्रीच्या वेळेत वीज गायब होण्याचे प्रमाण वाढल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, शेतीच्या कामांवरही त्याचा परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले.

लावणी गावात रात्रीच्या वेळी नियमित वीजपुरवठा होत नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. घरातील पंखे, दिवे तसेच इतर विद्युत उपकरणे बंद पडत असल्याने नागरिकांना उकाड्यात रात्र काढावी लागत असल्याची परिस्थिती निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो पूर्ववत होण्यासाठी बराच वेळ लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे गावातील दैनंदिन व्यवहारांवरही परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला.

लावणी परिसरातील शेतकऱ्यांसाठीही अनियमित वीजपुरवठा मोठी अडचण ठरत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. शेतीसाठी लागणारे पाणी, विद्युत मोटारी आणि इतर कामे वीजपुरवठ्यावर अवलंबून आहेत. मात्र, रात्रीच्या वेळी वीज उपलब्ध नसल्याने शेतीच्या कामांचे नियोजन कोलमडत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली.

वीजपुरवठ्याचे वेळापत्रक नियमित असावे आणि उपलब्ध वेळेत सुरळीत वीज मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# साईबाबांना चांद मियाँ, जिहादी, ब्रिटिश हेर, खुनी, बलात्कारी, दरोडेखोर आणि धर्मांतरणकर्ता ठरवणाऱ्या वादग्रस्त सामग्रीवर केंद्र शासनाने कारवाई करावी

**शिर्डी - प्रतिनिधी**

शिर्डीचे दैवत श्री साईबाबा यांच्याविरोधात समाजमाध्यमांवरून आक्षेपार्ह आणि प्रक्षोभक मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला तातडीने लक्ष घालण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेने दाखल केलेल्या नव्या अर्जावर सुनावणी करताना न्यायमूर्ती स्वर्ण कांता यांनी केंद्र सरकारला नोटीस बजावली असून पुढील नवीन तक्रारींचीही संबंधित प्राधिकरणाने दखल घ्यावी, असे स्पष्ट केले आहे.

श्री साईबाबा संस्थानने दाखल केलेल्या याचिकेनुसार, मार्च महिन्यापासून विविध यूट्यूब वाहिन्या आणि आंतरजाल पानांवरून साईबाबांविषयी अत्यंत अवमानकारक मजकूर प्रसारित केला जात आहे. या सामग्रीमध्ये साईबाबांची प्रतिमा मलिन करण्यासाठी त्यांना चांद मियाँ, जिहादी, ब्रिटिश गुप्तहेर, खुनी, बलात्कारी, दरोडेखोर तसेच धर्मांतरण करणारा अशा अत्यंत हीन आणि आक्षेपार्ह शब्दांत रंगवण्यात आल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. अशा मजकुरामुळे धार्मिक सलोखा धोक्यात येऊन समाजात तेढ निर्माण होण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे.

यापूर्वी संस्थानने यूट्यूबच्या तक्रार निवारण विभागाकडे दाद मागितली होती; मात्र यूट्यूबने तक्रारी फेटाळल्यामुळे शेवटी संस्थानने इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे दाद मागितली.

दरम्यान, तक्रार निवारण अपील समितीने १३ ऑगस्ट रोजी अशा प्रक्षोभक चित्रफिती आणि लेख तातडीने हटवण्याचे आदेश दिले होते. मात्र, तरीही यूट्यूबवरील सातहून अधिक चित्रफिती आणि संबंधित मजकूर अद्यापही उपलब्ध असल्याचे संस्थानच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ प्रमोद कुमार दुबे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. हा आक्षेपार्ह मजकूर समाजमाध्यमांवर असाच राहिल्यास तो महासाथीच्या रोगाप्रमाणे वेगाने पसरेल आणि जनभावनेचा उद्रेक होईल, असे निरीक्षण तक्रार निवारण अपील समितीने नोंदवले आहे.

या संपूर्ण प्रकरणावर विधिज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, ''श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांसारख्या संतांची अशी अक्षम्य बदनामी करणे हे अत्यंत निंदनीय आणि नियोजनबद्ध कटकारस्थान आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र शासनाला दिलेले निर्देश हे स्वागतार्ह आहेत. मात्र, केवळ न्यायालयीन कारवाईवर अवलंबून न राहता महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाने आणि भाविकाने समाजमाध्यमांवर पसरवल्या जाणाऱ्या अशा विद्वेषी अपप्रचाराबाबत अत्यंत सतर्क राहिले पाहिजे. समाजकंटक जाणीवपूर्वक धार्मिक भावना दुखावून सामाजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यामुळे अशा प्रक्षोभक मजकुराची त्वरित तक्रार करून कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करणे हे सुजाण नागरिकांचे कर्तव्य आहे.''

दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणी केंद्र सरकारकडून उत्तर मागवले असून पुढील सुनावणी ७ सप्टेंबर रोजी निश्चित केली आहे. आंतरजालावरून साईबाबांची बदनामी करणारा सर्व मजकूर तातडीने हटवण्यासाठी प्रशासन काय पावले उचलते, याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# जिल्हा परिषदेच्या शाळेतून थेट राज्य विक्रीकर अधिकारी पदापर्यंत चां थक्क करणारा प्रवास : पाच वर्षांच्या खडतर तपश्चर्येनंतर MPSC मध्ये गरुडझेप

**प्रतिकुलतेवर मात करून यशाला गवसणी घालणाऱ्या खरवलीच्या शुभम जंगम यांची यशोगाथा ठरणार स्पर्धा परीक्षार्थींसाठी दीपस्तंभ**

**बोरघर माणगांव - प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मौजे खरवली या ग्रामीण भागातून महाराष्ट्राला एक प्रेरणादायी यशकथा मिळाली आहे. खरवली चे सुपुत्र शुभम महेंद्र जंगम यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

सन २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षेत शुभम यांनी ओबीसी प्रवर्गातून संपूर्ण महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक मिळवत विक्रमी कामगिरी केली आहे. या यशाच्या जोरावर त्यांची विभागात राज्य विक्रीकर सहायक या प्रतिष्ठित पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या यशामुळे जंगम कुटुंबासह संपूर्ण खरवली गाव आणि माणगाव तालुक्याचा नावलौकिक वाढला आहे.

**शिक्षणाचा प्रवास - जिल्हा परिषदे पासून इंजिनिअरिंग पर्यंत**



शुभम यांचा शैक्षणिक प्रवास ग्रामीण संघर्षाचे उत्तम उदाहरण आहे.

इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण त्यांनी प्राथमिक शाळा खरवली येथे पूर्ण केले. ५ वी ते ९ वी पर्यंत नूतन माध्यमिक विद्यालय, खरवली आणि ९ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण अशोक दादा साबळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, माणगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि कम्युनिकेशन शाखेतून अभियांत्रिकीची पदवी संपादन केली. इंजिनिअरिंग नंतर तब्बल पाच वर्षे सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध अभ्यास करून त्यांनी हे यश खेचून आणले आहे.

**संस्कार आणि कष्ट - यशाचा पाया**

या यशामागे कौटुंबिक संस्कारांचा मोठा वाटा आहे. शुभम यांचे वडील महेंद्र जंगम हे नूतन माध्यमिक विद्यालय, खरवली येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. आई माधुरी जंगम या गृहिणी आहेत. शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या कुटुंबात वाढल्याने लहानपणापासूनच अभ्यासाची गोडी त्यांच्यात निर्माण झाली. कोणतेही ध्येय समोर ठेवल्यास ते पूर्ण होईपर्यंत माघार न घेण्याची वृत्ती त्यांच्या यशात निर्णायक ठरली.

शुभम यांनी सांगितले की, या प्रवासात शिक्षकांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचा अढळ विश्वास आणि मित्र परिवाराचे प्रोत्साहन हे तीन आधारस्तंभ ठरले.

**ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ**

मोठ्या शहरातील क्लासेस आणि सुविधा नसतानाही केवळ स्व-कष्टावर राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवता येते, हे शुभम यांनी सिद्ध करून दाखवले आहे. माणगाव तालुक्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी त्यांची ही कहाणी प्रेरणादायी आदर्श ठरली आहे.

**खरवली मध्ये भव्य मिरवणूक आणि सत्कार सोहळ्याचे आयोजन**

या नेत्रदीपक यशाचा गौरव म्हणून खरवली ग्रामस्थांच्या वतीने मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता खरवली गावातून खरवली हायस्कूल पर्यंत भव्य मिरवणूक आणि सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी मोफत मोटर व्यावसायिक ड्रायव्हर प्रशिक्षण

## जालना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा उपक्रम; रस्ता सुरक्षेसह रोजगाराच्या संधींना चालना देण्याचा प्रयत्न

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगारी कमी करण्याबरोबरच रस्ता सुरक्षेला प्रोत्साहन देण्यासाठी युवकांना मोटर व्यावसायिक ड्रायव्हर प्रशिक्षण देण्याचा उपक्रम जालना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. केंद्र शासन, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (), पुणे आणि इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग अँड रिसर्च (), पुणे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत पात्र युवक-युवतींना हलके मोटार वाहन () तसेच जड मोटार वाहन () चालविण्याचे शास्त्रोक्त, तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जाणार आहे. प्रशिक्षणामुळे युवकांना वाहनचालक क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येणार असून, प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर परिवहन क्षेत्रातील विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना केवळ वाहन चालविण्याचे प्रशिक्षण न देता आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रस्ता सुरक्षा, वाहतूक नियम, वाहनांची तांत्रिक माहिती आणि सुरक्षित वाहनचालक म्हणून आवश्यक असलेल्या विविध बाबींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणामध्ये , हायवे ड्रायव्हिंग तंत्र, ट्रॅफिक साईनबोर्डची माहिती व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके यांचा समावेश असणार आहे. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाच्या कालावधीत निवासाची तसेच भोजनाची मोफत व्यवस्था उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रशिक्षणादरम्यान दररोजचा अल्पाहार व जेवणाची सुविधा देण्यात येणार असून, निवासी प्रशिक्षणामुळे युवकांना प्रशिक्षणावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करता येणार आहे. तसेच प्रशिक्षणार्थींची आरोग्य व नेत्र तपासणी करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार चष्म्याचे वाटपही केले जाणार आहे.

# घरकुल सर्वेक्षणात सावळा गोंधळ? पात्र लाभार्थी वंचित; जिरडगावात ग्रामसभा घेऊन फेरसर्वेक्षणाची मागणी

## पक्क्या घरमालकांची नावे पात्र यादीत, तर कुडाच्या झोपडीत राहणारे गरजू लाभापासून दूर असल्याचा आरोप; सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रशासनाला इशारा

**घनसावंगी । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घनसावंगी तालुक्यात करण्यात आलेल्या घरकुल सर्वेक्षणाच्या प्रक्रियेवर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिरडगाव येथे सर्वेक्षणादरम्यान प्रत्यक्ष गरजूंना डावलण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, पक्क्या घरांमध्ये राहणाऱ्या काही कुटुंबांची नावे पात्र यादीत समाविष्ट करण्यात आली, तर कुडाच्या झोपड्या आणि अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहणाऱ्या कुटुंबांना घरकुलाच्या यादीतून वगळण्यात आल्याचा दावा सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे.

या कथित प्रकारामुळे गावातील गरजू कुटुंबांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, संपूर्ण घरकुल सर्वेक्षणाची पारदर्शकपणे फेरतपासणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. जिरडगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या वर्षा शामसुंदर शिंदे आणि सामाजिक कार्यकर्ते शामसुंदर हरिभाऊ शिंदे यांनी या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

**प्रत्यक्ष पाहणी न करताच यादी तयार केल्याचा आरोप**

घरकुल योजनेतील लाभार्थी निवडताना संबंधित कुटुंबाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती, घराची अवस्था आणि उपलब्ध सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करणे महत्त्वाचे असते. मात्र, जिरडगावमध्ये झालेल्या सर्वेक्षणात प्रत्यक्ष स्थळपाहणी न करता किंवा अपुरी पाहणी करून मनमानी पद्धतीने पात्र-अपात्र याद्या तयार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

गावातील काही कुटुंबे आजही मोडकळीस आलेल्या कुडाच्या घरात, झोपडीत किंवा अत्यंत अपुऱ्या निवाऱ्यात राहत असल्याचे सांगण्यात येत आहे. पावसाळ्यात या कुटुंबांना घर गळणे, भिंती कोसळण्याचा धोका, पाणी साचणे अशा समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचेही सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

अशा परिस्थितीत प्रत्यक्ष गरज असलेल्या कुटुंबांची नावे यादीत नसतील, तर घरकुल योजनेचा मूळ उद्देशच बाजूला पडतो, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

**पक्क्या घरांना पात्रता, झोपडीत राहणाऱ्यांना वंचित ठेवल्याचा दावा**

जिरडगावमधील सर्वेक्षणाबाबत सर्वाधिक गंभीर आरोप असा आहे की, ज्या कुटुंबांकडे पक्की घरे आणि मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा काही कुटुंबांची नावे पात्र यादीत असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे कुडाच्या घरात किंवा झोपडीत राहणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांची नावे यादीत नसल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे लाभार्थी निवडीची प्रक्रिया नेमकी कोणत्या निकषांवर झाली, सर्वेक्षण करणाऱ्या पथकाने कोणती कागदपत्रे आणि कोणते भौतिक निकष तपासले, प्रत्यक्ष घरांची पाहणी करण्यात आली का, याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**ग्रामसभा घेऊन फेरसर्वेक्षण करण्याची मागणी**

या पार्श्वभूमीवर जिरडगाव येथे तातडीने ग्रामसभा घेऊन घरकुल सर्वेक्षणाची संपूर्ण यादी ग्रामस्थांसमोर ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पात्र लाभार्थ्यांची नावे ग्रामसभेत तपासावीत, वंचित राहिलेल्या गरजू कुटुंबांना आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी आणि त्यानंतर प्रत्यक्ष स्थळपाहणी करून फेरसर्वेक्षण करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

ग्रामसभेत यादीची पारदर्शक छाननी झाल्यास पात्र व अपात्र लाभार्थ्यांबाबत ग्रामस्थांसमोर वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने कोणताही विलंब न करता ग्रामसभा बोलावून या प्रकरणाची चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**'गरजूंना न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील'**

सामाजिक कार्यकर्त्या वर्षा शामसुंदर शिंदे यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करताना सांगितले की, ''ज्यांच्याकडे सर्व सुखसोयी आहेत त्यांना लाभ मिळतोय आणि खरा गरजू आजही वंचित आहे. हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही.''

तर सामाजिक कार्यकर्ते शामसुंदर हरिभाऊ शिंदे यांनीही गरजू कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला. ''गरजूंना न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील. ग्रामसभा घेऊन फेरसर्वेक्षण हाच एकमेव न्याय्य मार्ग आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

**प्रशासनासमोर आता पारदर्शकतेचे आव्हान**

घरकुल योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू आणि निवाऱ्याच्या समस्येने त्रस्त असलेल्या कुटुंबांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. त्यामुळे लाभार्थी निवडीमध्ये तफावत असल्याच्या तक्रारी समोर आल्यानंतर प्रशासनाने त्याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. जिरडगावमधील कथित अनियमिततेची चौकशी करून प्रत्यक्ष स्थळपाहणी, कागदपत्रांची पडताळणी आणि ग्रामसभेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांची फेरछाननी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. प्रशासनाने या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यास संबंधित विभागाकडे लेखी तक्रारी दाखल करून वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करण्याचा इशाराही सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे. आता प्रशासन ग्रामसभा घेऊन फेरसर्वेक्षण करते का, वंचित गरजू कुटुंबांना न्याय मिळतो का आणि घरकुल लाभार्थी निवडीची वस्तुस्थिती काय आहे, याकडे जिरडगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# ८६ वर्षांची परंपरा कायम! लक्ष्मीनारायण भगवंताची पालखी उत्साहात

## जुन्या पिढीने सुरू केलेली परंपरा नव्या पिढीनेही जपली; टाळकरी, लेझीमच्या गजरात पालखी सोहळा संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील लक्ष्मीनारायणपुरा परिसरात गेल्या ८६ वर्षांपासून सुरू असलेली लक्ष्मीनारायण भगवंताची पारंपरिक पालखीची परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. जुन्या पिढीने सुरू केलेली ही धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आज नव्या पिढीकडूनही तितक्याच श्रद्धेने पुढे नेली जात असल्याचे यावेळी पाहायला मिळाले.

लक्ष्मीनारायणपुरा येथून पारंपरिक पद्धतीने पालखी सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. पालखी मस्तगड, मुक्ता बिल्डिंग, मामा चौक, पाणीवेस,



फुले मार्केट, सराफा बाजार आदी प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत पुन्हा लक्ष्मीनारायणपुरा येथे पोहोचली. पालखीच्या मार्गावर नागरिक व भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

पालखी सोहळ्यात टाळकरी, मलकाम तसेच लेझीम पथकांनी सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात पालखी पुढे जात असताना नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. अनेक भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले.

**मान्यवरांची उपस्थिती**

या पालखी सोहळ्यात युवासेना मराठवाडा सचिव अभिमन्यू खोतकर, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, नगरसेवक अश्विन आंबेकर, नगरसेवक महावीर ढक्का, नगरसेवक रमेश गोरक्षक, युवासेना लोकसभा सचिव शुभम टेकाळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. पालखी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी लक्ष्मीनारायणपुरा मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ८६ वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा पुढील पिढीकडेही सोपविण्याचा संकल्प यानिमित्ताने अधिक दृढ झाला.

धार्मिक श्रद्धेसोबतच शहराची सांस्कृतिक ओळख जपणारी ही ८६ वर्षांची परंपरा आजही कायम असून, नव्या पिढीचा वाढता सहभाग ही या परंपरेची विशेष बाब ठरली आहे.

# नांदेड मनपातर्फे एकल महिला सर्वेक्षण सुरू व्हावे - गजानन जोशी



**नांदेड - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील एकल महिला सर्वेक्षण व नोंदणी साठी महायुती सरकारने निर्णय केला असून,नगर परिषद संचालनालय मार्फत सर्व नगर परिषद,नगर पंचायत व सर्व महानगरपालिका यांना एकल महिला नोंदणी करणेसाठी सूचनापत्राद्वारे विनंती केलेली आहे. या विषयी प्रत्यक्ष कामासाठी मनपा कर्मचारी टीम गठीत करून घरोघरी जाऊन एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात यावे असेही पत्रात नमूद केलेले आहे. नांदेड महानगरपालिका महिला बाल कल्याण सभापती सौ.सदिच्छा सोनी यांना दिलेल्या निवेदनात प्रभाग निहाय एकल महिला सर्वेक्षण व नोंदणी साठी कर्मचारी *(पान २ वर)*

# अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी आरोपीला १० वर्षांची सक्तमजुरी

## १६ वर्षीय मुलीला गर्भवती केल्याप्रकरणी नितीन पोटदुखेला शिक्षा; मदत करणाऱ्या दोघांना सहा महिन्यांची सक्तमजुरी, एकूण २० हजारांचा दंड पीडितेला देण्याचे न्यायालयाचे आदेश

**जालना । प्रतिनिधी**

१६ वर्षीय अल्पवयीन मुलीशी लैंगिक संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याप्रकरणी आरोपी नितीन दत्तू पोटदुखे (वय १९) याला जालना येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक-४ यांनी १० वर्षांची सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. तसेच अल्पवयीन मुलीला आरोपीसोबत नेण्यास आणि त्याला मदत करण्यास हातभार लावल्याप्रकरणी शिवाजी विश्वनाथ कालबिले (वय २९) आणि बाली उर्फ किरण



शिवाजी कालबिले यांना प्रत्येकी सहा महिन्यांची सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली.

विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश कृपेश मोरे यांनी २५ ऑगस्ट २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. या प्रकरणात न्यायालयाने आरोपींकडून वसूल करण्यात येणारी एकूण २० हजार रुपयांची दंडाची रक्कम पीडित मुलीला देण्याचे आदेशही दिले आहेत.

**सात-आठ महिन्यांपासून अत्याचार केल्याचा आरोप**

या प्रकरणातील पीडित मुलगी १६ वर्षांची होती. आरोपी नितीन पोटदुखे आणि पीडितेची गावे जवळ असल्याने त्यांची ओळख झाली होती. आरोपीकडे छोटा हत्ती वाहन असल्याने पीडिता इतर मजुरांसह आजूबाजूच्या गावांमध्ये कामासाठी त्याच्या वाहनातून जात होती.

या काळात आरोपीने पीडितेशी ओळख वाढविल्याचे तपासात समोर *(पान २ वर)*

# शेतकऱ्यांनी केवळ उत्पादक न राहता उद्योजक व्हावे सुनील वानखेडे यांचे आवाहन

## *नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत कृषी व्यवसाय घटक प्रशिक्षण संपन्न; जालना येथील कार्यक्रमात तज्ज्ञांचे मार्गदर्शन*

**जालना - प्रतिनिधी**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत कृषी व्यवसाय घटक प्रशिक्षणाचे आयोजन कलश मंठा चौफुली, जालना येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगरचे विभागीय कृषी सहसंचालक श्री. सुनील वानखेडे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून 'आत्मा' जालनाचे प्रकल्प संचालक श्री. अमोल आगवन, उप विभागीय





कृषी अधिकारी श्री पवार सर, उपसंचालक संजय कायंदे,नोडल अधिकारी श्री. सचिन पांचाळ, सनदी लेखापाल (सीए) नंदकिशोर अग्रवाल, वैजनाथ धांडे आणि धनंजय मस्के, बँकेचे व्यवस्थापक श्री गायके, वखार महामंडळ चे अभिषेक रेळेकर, योगेश तहकीक आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात 'आत्मा'चे प्रकल्प संचालक श्री. अमोल आगवन यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी उपस्थितांना कृषी व्यवसाय घटकांचे महत्त्व आणि योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले. नोडल अधिकारी श्री. सचिन पांचाळ यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत पूर्वसंमती मिळवण्याची प्रक्रिया सोप्या भाषेत शेतकऱ्यांना समजावून सांगितली.

व्यवसाय उभारणीसाठी आर्थिक नियोजनाबाबत मार्गदर्शन करताना सनदी लेखापाल नंदकिशोर अग्रवाल यांनी प्रकल्प अहवाल कसा तयार करावा, तसेच गोडाऊन निर्मिती व आर्थिक व्यवस्थापन याविषयी महत्त्वाची माहिती दिली.

# परतूर येथे राजस्थानी विप्र समाजाची नूतन कार्यकारिणी जाहीर

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर येथील राजस्थानी विप्र समाजाची नूतन कार्यकारिणी निवडण्यासाठी २३ ऑगस्ट रोजी गायत्री मंदिर येथे बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. नगरसेवक राजेश खंडेलवाल आणि सुरेश जोशी यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत समाजाच्या पुढील कार्यकाळासाठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी मावळते अध्यक्ष श्यामसुंदर चितोडा, उपाध्यक्ष नटवर खंडेलवाल आणि सचिव अश्विन दायमा यांनी आपल्या कार्यकाळातील कामकाजाचा अहवाल सभेसमोर मांडला. समाजाच्या विविध उपक्रमांचा तसेच मागील कार्यकाळातील कामांचा आढावा घेतल्यानंतर पुढील कार्यकाळासाठी नवीन कार्यकारिणी



निवडण्याची प्रक्रिया पार पडली. यावेळी समाजाच्या अध्यक्षपदी संतोष शर्मा यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी किशोर व्यास, तर सचिवपदी केदार खंडेलवाल यांची निवड करण्यात आली. तसेच सहसचिवपदी गोविंद शर्मा, कार्याध्यक्षपदी शिवजी जोशी आणि कोषाध्यक्षपदी श्याम ओझा यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा उपस्थित समाजबांधवांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. समाजाच्या एकजुटीला अधिक बळ देणे, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना चालना देणे तसेच समाजातील विविध घटकांना एकत्रित आणण्यासाठी आगामी काळात प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीस प्रभू दयाल सारस्वत, अनिल पारीख, संतोष व्यास, गणेश ओझा, लखन जोशी, दीपक शर्मा, नितीन जोशी, व्यंकटेश व्यास, अक्षय ओझा, शुभम शर्मा , श्रीकांत खंडेलवाल यांच्यासह राजस्थानी विप्र समाजाचे अनेक सदस्य उपस्थित होते.

नवीन कार्यकारिणीच्या निवडीमुळे समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, नूतन पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली समाजाच्या विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.



जालना येथील ऐतिहासिक पाणीवेस कुंभार गल्लीत गणपती बाप्पाच्या मूर्तीवर रंगाचा शेवटचा हात फिरवताना मूर्तिकार. बाप्पाच्या आगमनाची तयारी अंतिम टप्प्यात (छाया मजहर सौदागर)

# नि.पिंपळगाव येथील घरकुल यादीतील त्रुटी दूर करून ९७ लाभार्थ्यांची यादी कायम ठेवण्याची मागणी

## *गट विकास अधिकारी यांना निवेदन*

**अंबड -प्रतिनिधी**

प्रणाली द्वारे नाकारलेल्या घरकुल लाभार्थी यादीमध्ये आढळलेल्या त्रुटींची तातडीने पडताळणी करून त्यात सुधारणा करण्यात यावी, तसेच ९७ पात्र लाभार्थ्यांची यादी जशीच्या तशी कायम ठेवावी, या मुख्य मागणीसाठी नि.पिंपळगाव येथील सर्व संबंधित घरकुल लाभार्थ्यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या घरकुल यादीमध्ये काही त्रुटी दिसून आल्या आहेत. त्यामुळे या त्रुटींची योग्य ती पडताळणी



करून त्यात आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रणाली द्वारे नाकारण्यात आलेल्या ९७ पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळण्यासाठी तातडीने कारवाई करावी आणि पात्र लाभार्थ्यांवर अन्याय होऊ न देता न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या निवेदनावर रविंद्र राजेंद्र ढेंबरे, सतिश बाबुराव मोरे,नाथा शिवाजी कुमकर, गंगाधर विश्वनाथ मिठे, बाबासाहेब रामचंद्र वैद्य, बालासाहेब संपतराव गोल्डे आणि लक्ष्मीबाई चत्रभुज गोल्डे यांच्यासह इतर लाभार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत - गटशिक्षणाधिकारी क्षीरसागर

## *मंठा येथे तालुकास्तरीय पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षण*

**मंठा - प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार पुनर्रचित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचे अद्ययावत ज्ञान शिक्षकांना मिळावे, तसेच बदलत्या शैक्षणिक गरजांनुसार विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक ज्ञान, कौशल्ये व मूल्ये विकसित व्हावीत, यासाठी मंठा तालुक्यात तालुकास्तरीय पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणास २५ ऑगस्ट रोजी गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांनी भेट देऊन



शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी मार्गदर्शन करताना गटशिक्षणाधिकारी क्षीरसागर म्हणाले की, ''विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी सातत्याने प्रयत्न करावेत. नवीन अभ्यासक्रमातील संकल्पना समजून घेऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी वर्गातील अध्यापन प्रक्रियेत करणे आवश्यक आहे.'' विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यज्ञान न देता त्यांच्या विचारशक्ती, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता, संवादकौशल्य आणि जीवनोपयोगी कौशल्यांचा विकास करण्यावर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या अनुषंगाने भाषा, गणित, आपल्या सभोवतालचे जग भाग १ व २, कलाशिक्षण, कार्यशिक्षण, शारीरिक शिक्षण व निरामयता, समग्र प्रगतीपत्रक तसेच विद्यार्थी सुरक्षा या विषयांवर शिक्षकांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात येत आहे.

इयत्ता दुसरीच्या वर्गशिक्षकांसाठी १८ ते २० ऑगस्ट या कालावधीत १५० शिक्षकांना प्रशिक्षण घेण्यात आले. इयत्ता तिसरी व चौथीच्या वर्गशिक्षकांसाठी २१ ते २५ ऑगस्ट *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.